2019030615433144405

विक्रीकर विभागातील विक्रीकर सहआयुक्त संवर्गाची दि. ०१ जानेवारी, २०१५ ची स्थिती दर्शविणारी तात्पुरती ज्येष्ठतासूची.

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक :- विज्येसू १२१५/प्र.क्र.४४/विक्रीकर (प्रशासन - ३)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक : १३ नोव्हेंबर, २०१७

वाचा :- १. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही/२०११/प्र.क्र.२८४/१२, दि.२१.१०.२०११

२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. विज्येसू १४१४/प्र.क्र.३९/विक्रीकर (प्रशासन-३) दि.२३.१२.२०१४

-: परिपत्रक :-

१. माननीय सर्वोच्च न्यायालयाने विक्रीकर कार्यालयातील विक्रीकर निरीक्षक संवर्गाच्या ज्येष्ठतासूची बाबत दि.१२.०१.२००० रोजी निकाल दिला. त्या निकालानुसार विक्रीकर कार्यालयाने १९७२ पासूनच्या विक्रीकर निरीक्षकांच्या ज्येष्ठतायादया सुधारीत केल्या. त्याअनुषंगाने विक्रीकर अधिकारी व सहायक विक्रीकर आयुक्त या संवर्गाच्या ज्येष्ठता याद्याही सुधारित केल्या. त्यानुसार विक्रीकर उपआयुक्त संवर्गाच्या सन १९८२-८३ ते १९९२-९३ पर्यंतच्या निवडसूच्या सुधारित केल्या. त्यास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता प्राप्त झाली आहे. त्यापुढील सन १९९३-९४ ते सन २०११-१२ पर्यंतच्या निवडसूच्या सुधारित केल्या. त्यास सामान्य प्रशासन विभागाची मान्यता प्राप्त झाली आहे. त्याअनुषंगाने विक्रीकर सहआयुक्त संवर्गाच्या सन १९८२-८३ ते २०११-१२ या वर्षाच्या निवडसुच्या सुधारित केल्या. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र. २ नुसार विक्रीकर विभागातील विक्रीकर सहआयुक्त संवर्गाची दि. ०१.०१.२०१४ ची स्थिती दर्शविणारी अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. दि. ०१.०१.२०१४ ते दि. ३१.१२.२०१४ या कालावधीत विक्रीकर सहआयुक्त पदी पदोन्नत झालेल्या अधिकाऱ्यांची नावे अंतर्भूतत करून विक्रीकर सहआयुक्त संवर्गाची दि. ०१.०१.२०१५ ची स्थिती दर्शविणारी तात्पुरती ज्येष्ठतासुची सोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" नूसार प्रसिध्द करण्यात येत आहे.

३. विक्रीकर सह आयुक्त पदावरील अधिकाऱ्यांची वरिलप्रमाणे तात्पुरती ज्येष्ठतासुची तयार करताना विक्रीकर उपआयुक्त संवर्गाची दि. ०१.०१.२०१४ ची स्थिती दर्शविणारी दि. २३.१२.२०१४ रोजी प्रसिध्द केलेली अंतिम ज्येष्ठतासूची विचारात घेण्यात आली आहे.

४. विक्रीकर सह आयुक्त पदावरील तात्पुरती ज्येष्ठतासूची पुढील अटींच्या अधिन राहून प्रसिद्ध करण्यात येत आहे.

अ) सदर ज्येष्ठतासूची संबंधीत अधिकाऱ्याच्या विक्रीकर सहआयुक्त पदावरील निवडसूचीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता मिळण्याच्या अधिन राहून प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ब) ज्या अधिकाऱ्यांच्या जातीप्रमाणपत्रांची पडताळणीअभावी किंवा अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय

चौकशी प्रस्तावित/प्रलंबित आहे या कारणास्तव नियमित पदोन्नतीचे आदेश अद्याप निर्गमित केलेले नाहीत, अशा अधिकाऱ्यांची नावे या ज्येष्ठतासूचीत समाविष्ट केलेली नाहीत. त्यांचे नियमित पदोन्नतीचे आदेश निर्गमित झाल्यानंतर त्यांचा ज्येष्ठतासूचीत यथास्थिती समावेश करण्यात येईल.

क) श्री.बी.टी देशमुख यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेली रिट याचिका क्र. ६४८९/२००० वरील निर्णयाच्या अधीन राहून तसेच विविध न्यायालयीन प्रकरणांमध्ये दिलेल्या निर्णयानुसार कनिष्ठ संवर्गाच्या ज्येष्ठतेत झालेला बदल विचारात घेऊन ज्येष्ठताक्रम निश्चित करण्यात आलेला आहे. ही ज्येष्ठता यादी विक्रीकर विभागातील ज्येष्ठतेसंदर्भात न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिकांवरील निर्णयाच्या अधिन राहुन तात्पुरत्या स्वरुपात प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ड) सदर ज्येष्ठतायादी तयार करताना महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियम) नियमावली १९८२ मधील नियम विचारात घेवून अधिकाऱ्यांची ज्येष्ठता, निवडसूचीतील क्रमांकानुसार तयार करण्यात आली आहे. म्हणजेच जे अधिकारी पूर्वीच्या मूळ निवडसूचीनुसार विक्रीकर सहआयुक्त पदावर पदोन्नत झालेले आहेत, परंतु सुधारित निवडसूचीनुसार योग्य त्या निवडसूचीत समावेश झालेले आहेत त्या निवडसूचीतील ज्येष्ठता क्रमानुसार नांवे निश्चित करण्यात आलेली आहेत. तसेच त्यांच्या नावासमोर नमूद केलेला दिनांक हा शासन अधिसूचना साप्रवि, क्र. एसआरव्ही.१०७६/१२ दि.२१ जून १९८२ नुसार फक्त विक्रीकर सहआयुक्त या पदाच्या ज्येष्ठतेसाठी धरण्यात येईल. इतर कोणत्याही आर्थिक लाभांसाठी तो दिनांक गृहीत धरला जाणार नाही.

५. विक्रीकर आयुक्तांनी ही ज्येष्ठतायादी सर्व अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणण्याची कार्यवाही करावी व सर्व अधिकाऱ्यांनी नोंद घेतल्याची पोचपावती त्यांच्या कार्यालयात ठेवावी.ज्येष्ठतासूची संदर्भात त्रुटी/उणिवा/आक्षेप असल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी ज्येष्ठता यादी प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत संबंधित कार्यालयामार्फत विक्रीकर आयुक्त कार्यालयात सादर करावेत. विक्रीकर आयुक्त कार्यालयाने प्राप्त झालेल्या हरकती/आक्षेप/त्रुटींची तपासणी करून प्रस्ताव एकत्रित स्वरूपात अभिप्रायांसह तात्काळ शासनास सादर करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अनघा अ.पटवर्धन)
कक्ष अधिकारी, वित्त विभाग.

प्रत,

१) राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, राज्यकर भवन, माझगांव,मुंबई.

२) विशेष राज्यकर आयुक्त, राज्यकर भवन, माझगांव, मुंबई

३) राज्यकर विभागातील सर्व अपर राज्यकर आयुक्त.

४) राज्यकर उपआयुक्त (जनसंपर्क) महाराष्ट्र राज्य, मुंबई.

५) सर्व संबंधित अधिकारी (विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मार्फत)

६) कार्यासन अधिकारी, (विप्र-१/विप्र-२) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) निवडनस्ती वि.प्र. ३.

परिशिष्ट-अ

वित्त विभाग परिपत्रक क्र. विज्येसू १२१५/प्र.क्र४४/विक्रीकर (प्रशासन-३), दि. १३/११/२०१७

विक्रीकर सह आयुक्त संवर्गाची दि.०१.०१.२०१५ रोजीची स्थिती दर्शविणारी तात्पुरती ज्येष्ठतासूची.

ज्येष्ठता क्रमांक	अधिकाऱ्यांचे नाव		प्रवर्ग	जन्मदिनांक	नियुक्ती प्रकार	विक्रीकर सहआयुक्त पदावरील नियुक्ती दिनाक	ज्येष्ठतेसाठी समायोजनाचा दिनांक	शेरा
१	२		३	४	५	६	७	८
१	श्री.	दिंनकर अण्णा पाटील	खुला	०२.०६.६०	प	१६.०१.१४	१६.०१.१४	
२	श्री.	राजेंद्र दत्तात्रय भगत	खुला	०९.०९.६२	प	१८.०६.१४	१८.०६.१४	
३	श्री.	पुरूषोत्तम विठ्ठल गावंडे	इ मा व	०१.०१.६०	प	१८.०६.१४	१८.०६.१४	